**BOV**

100114

**2007**

# मराठी वाङ्मय - I ( वैकल्पिक )

**स्तर : पदवी**

**एकूण गुण : 200**

**स्वरूप : पारंपारिक**

**कालावधी : 3 तास**

**सूचना :**

*(i)* *सर्व प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहावीत.*

*(ii)* *प्रश्न क्रमांक 1* ***ह्या अनिवार्य आहे.*** *उर्वरित प्रश्नांपैकी प्रत्येक विभागातून एक, याप्रमाणे चार प्रश्न सोडवा.*

*(iii)* *प्रश्नाच्या उजवीकडील अंक त्या प्रश्नाचे गुण दर्शवितात.*

*(iv)* *ज्या क्रमाने निर्धारित संख्येपर्यंत पर्यायी प्रश्नसंख्या सोडविली आहे, तेवढीच प्रश्नसंख्या तपासली जाईल, अतिरिक्त उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(v)* *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास जास्त गुण देण्यात येतील.*

*(vi)* *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत: किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(vii)* *प्रत्येकी 10, 15 आणि 20 गुण असलेल्या प्रश्नांची उत्तरे परिक्षार्थींकडून अनुक्रमे 125, 175 आणि 250 शब्दांमध्ये अपेक्षित आहेत.*

**1.** खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा. (प्रत्येकी 10 गुण) **40**

(अ) मराठीवर इतर कोणकोणत्या भाषांचा प्रभाव पडलेला आहे? ते उदाहरणासह स्पष्ट करा.

(ब) राजभाषा म्हणून मराठीचा झालेला व होत असलेला विकास सांगून राजभाषा म्हणून विकास होण्यामागील अडचणी स्पष्ट करा.

(क) इ.स. 1818 ते 1990 ह्या कालखंडामधील निबंध ह्या वैचारिक वाङ्मय लिहिणाऱ्या साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृतींचा परिचय द्या.

(ड) समीक्षेचे स्वरूप, प्रकार आणि प्रयोजन स्पष्ट करा.

(इ) इलेक्ट्रॉनिक्स ह्या संपर्क माध्यमाचे संपर्क माध्यम म्हणून परीक्षण करा.

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

| | गुण |
|---|---|

### विभाग - अ

2. खालील उपप्रश्न सोडवा.

| | |
|---|---|
| (अ) भाषा आणि समाज ह्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा. | 10 |
| (ब) प्रमाणभाषा आणि बोलीभाषा म्हणजे काय? प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांचे स्वरूप व परस्पर संबंध स्पष्ट करा. | 10 |
| (क) मराठीतील शब्दांच्या जाती उदाहरणासहित स्पष्ट करा. | 10 |
| (ड) मराठी भाषेतील काळ ही संज्ञा सोदाहरण स्पष्ट करा. | 10 |

3. खालील उपप्रश्न सोडवा.

| | |
|---|---|
| (अ) भाषाविज्ञान म्हणजे काय? भाषाविज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करा. | 10 |
| (ब) वऱ्हाडी बोलीची व्याख्या व वैशिष्ट्ये सांगा. | 10 |
| (क) मराठीतील विभक्तीप्रत्यय सोदाहरण स्पष्ट करा. | 10 |
| (ड) मराठीतील प्रयोगविचार उदाहरणासहित स्पष्ट करा. | 10 |

www.mpscmaterial.com

### विभाग - ब

4. खालील उपप्रश्न सोडवा.

| | |
|---|---|
| (अ) ज्ञानभाषा म्हणून मराठीचा झालेला व होणारा विकास आणि त्यामधील अडचणींचे वर्णन करा. | 15 |
| (ब) लोकसाहित्याचे विविध प्रकार उदाहरणासहित स्पष्ट करा. | 15 |
| (क) लोकसाहित्य आणि मौखिक परंपरा ह्यातील साम्य व भेद संबंध स्पष्ट करा. | 10 |

5. खालील उपप्रश्न सोडवा.

| | |
|---|---|
| (अ) भाषांतराचे प्रयोजन, स्वरूप, व्याप्ती आणि अडचणी स्पष्ट करा. | 15 |
| (ब) लोकसाहित्याच्या निर्मितीमागच्या विविध प्रेरणा व स्वरूप वर्णन करा. | 15 |
| (क) लोकसाहित्याच्या विविध व्याख्या देऊन लोकसाहित्याने केलेल्या वाङ्मयीन कार्याचे समालोचन करा. | 10 |

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग – क

6. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) महानुभाव पंथाची माहिती देऊन त्यांनी केलेले कार्य स्पष्ट करा. 10

(ब) संत वाङ्मय म्हणजे काय? संतांनी केलेल्या कार्याचा परीचय घडवा. 10

(क) केशवसुतांना आधुनिक मराठी काव्याचे प्रणेते का म्हणतात? 10

(ड) श्री ह. ना. आपटे यांच्या वाङ्मयीन कर्तृत्त्वाचे मूल्यमापन करा. 10

7. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) बखर वाङ्मय आणि ऐतिहासिक पत्रव्यवहार ह्यांनी केलेल्या वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन करा. 10

(ब) शाहिरी वाङ्मय म्हणजे काय? शाहिरांनी केलेल्या कार्याचा परिचय घडवा. 10

(क) दलित साहित्य म्हणजे काय? ह्या साहित्याने केलेल्या कार्याचा परिचय द्या. 10

(ड) ग्रामीण साहित्याने केलेल्या सामाजिक व वाङ्मयीन कार्याचा परामर्ष घ्या. 10

## विभाग – ड

8. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) साहित्यकृतीचे मूल्यमापन करतांना कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो? 10

(ब) विविध समीक्षा पद्धतींची नावे सांगून आस्वादक समीक्षेचा परीचय घडवा. 10

(क) अभिधा, लक्षणा, व्यंजना ह्या संज्ञा सोदाहरण स्पष्ट करा. 10

(ड) रस म्हणजे काय? रसांची संख्या किती? ते उदाहरणासहित स्पष्ट करा. 10

9. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) वाङ्मयीन वास्तववाद समजावून सांगा. 10

(ब) गांधीवादी वाङ्मयाचा आढावा घ्या. 10

(क) शोकांतिकेची व्याख्या देऊन एका शोकांतिकेचे उदाहरण द्या. 10

(ड) कॅथार्सिसच्या सिद्धांताचे परीक्षण करा. 10

- o 0 o -

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

www.mpscmaterial.com

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial